# पूर्व विदर्भातील कोहळी समुदाय आणि मामा तलाव

नरेश जगन बारबुद्धे, स्नातकोत्तर मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
Email- nareshbarbuddhe@gmail.com
प्रा. डॉ. तीर्थराज कापगते, मराठी विभाग प्रमुख, श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढळ

**सारांश**

मामा तलाव म्हणजे माजी मालगुजरी तलाव होय. महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक माजी मालगुजारी तलाव पूर्व विदर्भात आहेत. विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात गोंडराज्यांच्या कालावधीत सिंचनासाठी या तलावांची निर्मिती करण्यात आली होती. शेतीला याच मालगुजरी तलावांच्या पाण्यातून सिंचनाची सोय होत असे. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात या तलावांकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे या तलावांची सिंचनक्षमता घटली आहे. या तलावांचे नूतनीकरण केल्यास सिंचन क्षमता वाढून या भागात शेती सिंचनाची सोय होईल. प्रस्तुत लेखात पूर्व विदर्भातील मामा तलावांचा इतिहास, तलावांचे प्रकार, त्यांची संख्या, मामा तलावांचे महत्व या बद्दल आढावा घेण्यात आला आहे.

**बीजशब्द :- बांध, बोळी, तळे, पार,**

**प्रस्तावना :-** भारतीय शेती संदर्भात नेहमी उद्गार काढण्यात येतात की भारतीय कृषिव्यवसाय हा संपूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. पाऊस आला तर भरपूर पीक आणि पावसाने धोका दिला तर सारेच प्रयत्न असफल, असे भारतीय कृषीचे निराशाजनक चित्र रेखाटण्यात येते. बेभरवशाचा पाऊस व शेतकऱ्याचे परिश्रम यांच्यातील लपंडाव सतत चालू असतो. त्यामुळेच रोहिणी नक्षत्राला सुरूवात झाली की आकाशाकडे शेतकरी डोळे लावून बसतो आणि मृग नक्षत्राने आपला काहीच प्रताप दाखविला नाही की आशाळभूत शेतकऱ्याचा जीव कासावीस होतो. शेतकऱ्यांची ही असाह्य निसर्गशरणता ज्या शेतकरी जमातींनी स्वत:च्या प्रयत्नांनी थोडीबहुत दूर केली त्यांच्यात कोहळी जमात प्रमुख होय. आपल्या अचाट बुद्धिसामर्थ्याने, अफाट प्रयत्नाने आणि अथक परिश्रमाने कोहळी जमातीने आपल्या शेतास पाणी पोहचेल व पुरवील अशी असंख्य तळी निर्माण करून स्वतःचे वेगळे असे गौरवास्पद स्थान निर्माण केले आहे. पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांतील बहुसंख्य तळ्यांचे निर्माते कोहळी जमातीचे लोक हे होत. या जिल्ह्यात तलावांची संख्या इतकी आहे की त्यांचा निश्चित असा आकडा देखील सांगणे अशक्य होऊन बसले आहे. म्हणून या जिल्ह्यांना महाराष्ट्रातील तलावांचे जिल्हे अशी वेगळी ओळख आहे.

**मामा तलावांचा इतिहास :-** मामा तलावांचा इतिहास किमान तीनशे-साडेतीनशे वर्षांपूर्वीचा आहे. पूर्व विदर्भात गोंड राजांची राजवट होती. हे राजे काशीला यात्रेसाठी जात असत. तेव्हा प्रवासाची साधनं मर्यादित होती. प्रवासादरम्यान वाटेतील परिसराचा राजांकडून अभ्यास केला जात असे. याच अभ्यासात एकदा संग्रामशहा व हिदरशहा या गोंड राज्यांना कोयरी (कोहळी) जातीचे लोक तलाव बांधून फळं, भाजीपाला आणि ऊस पिकवत असल्याचं दिसलं. त्यांच्या शेतीचं क्षेत्र फारच लहान असल्याने त्यांना मर्यादा होत्या. अशाच काही लोकांना राजाने हेरलं. अधिक जमिनी देण्याचं वचन देऊन आपल्या राजवटीत आणलं. त्यांना भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, दक्षिण नागपूर आणि बालाघाटच्या जंगल भागातील जमिनी दिल्या. त्यांनी जंगल कापून तलाव बांधले. या तलावातल्या पाण्यावर शेती सुरू केली. कोहळी लोकांना इकडे स्थलांतरीत होण्याचे प्रयोजन सांगताना वि.स. वाघाये म्हणतात, "गोंड राजांनी केवळ तलाव बांधण्यासाठी यांना इकडे आणले. तर आर. आर. गेडाम म्हणतात, "बरीचशी तळी गोंड राजांच्या कारकिर्दीत कोहळी या जातीच्या मालगुजारांनी बांधली असून या तळ्यातील पाण्यापासून ते आपल्या शेतीचे ओलीत करीत असत. याच तलावांना 'माजी मालगुजारी तलाव' म्हणून नामाभिधान दिले गेले आहे. पुढे गोंड राजवट संपून नागपूरकर भोसल्यांचं राज्य आलं. या राजवटीत महसूल यंत्रणा विकसित झाली. त्यांनी या तलावांच्या नोंदी घेतल्या. तलावाचे हक्क 'कोहळी' मालगुजारांना दिले. 'वाजिब-उल अर्ज' म्हणून आजही सरकार दप्तरी या नोंदी सापडतात. या काळात व्यवहाराची भाषा फारसी असल्याने अशा पद्धतीने नोंदी घेतल्या गेल्या. या नोंदी घेतानाच त्यांनी शेतकऱ्यांना पाण्याचे हक्क दिले. राज्यात अशा पद्धतीने पाणीहक्क देण्यासाठी आता मात्र महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरण (मजनिप्र) स्थापन करण्यात आलं आहे. पण पूर्व विदर्भात अशा पद्धतीची व्यवस्था सुमारे तीनशे वर्षांपूर्वी मामा तलावाच्या संदर्भात अस्तित्वात होती.

**तलावांचे प्रकार:-** तलावांचे बांध, तळे व बोडी असे तीन प्रकारांमध्ये विभाजन करता येते. कोहळी समाज जेथे वसला तेथे त्याने शेतजमिनीची निवड करण्यापूर्वी प्रथम शेतीस पाणी देण्याची सोय पाहिली. त्यासाठी त्याने पाणी साठवून ठेवता येईल अशी वरची जागा निवडली आणि तेथे तलाव निर्माण केले. या निवडीत एखादी जागा अशी गवसली की सभोवताल टेकड्या आहेत आणि थोडीशी पाळ बांधली की जलाशय तयार होऊ शकतो. या जलाशयाला कोहळी समाजाने "बांद" किंवा "बांध' म्हटले आहे . नवेगावबांध, शिवनीबांध, शिरेगावबांध ही अशीच काही उदाहरणे होत. अनेकदा शेताच्या वरच्या बाजूस खोलगट जागा पाहून व पावसाचा येवा म्हणजे आवक पाहून तेथे एक मोठी पाळ बांधण्यात येते. या एकाच पाळीने जे जलाशय तयार होते त्यास कोहळी समाज "तळे" असे संबोधतात. कोहळी शेतकऱ्यांनी भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये बांधलेली अशी असंख्य तळी आहेत. मालिजुंगा, विर्शी, साकोली, वालमाझरी येथील तळे ही अशीच काही उदाहरणे होत. या शिवाय शेताच्या गरजेप्रमाणे शेताचा वरचा धुरा (पार) थोडा रूंद व मज़बूत करून त्या शेतास चार महिने पाणी पुरवू शकेल एवढाच जलाशय तयार करण्याकडे कोहळी शेतकऱ्यानी पसंती दिली. तळ्याची ही लहान प्रतिकृती 'बोडी' या नावाने संबोधिली जाते. आजही गरजेनुसार बोडी तयार करण्याची प्रवृत्ती कोहळी शेतकऱ्यात आढळून येते. बोडीच्या पाण्याचा उपयोग धानपिकाकरिता करून त्यानंतर बोडीची रिकामी जमीन गहू किंवा हरबरा यांच्या रब्बी पेरणीसाठी वापरली जाते. कोहळी पाट्यात या बोड्यांची संख्या लाखोनी असून त्यांच्यात दररोज वृद्धी होत आहे. वरील माहितीवरून तलावांचे बांध, तळे व बोडी असे तीन प्रकार समजता येऊ शकतात.

**मामा तलावांची संख्या:-** भंडारा जिल्ह्यात (म्हणजे सांप्रतचा गोंदिया सह) एका खेड्याला आठ तलाव असे प्रमाण सांगून या जिल्ह्यात ५८० मोठे आणि १३,७५८ लहान व मध्यम तलावांची नोंद भंडारा जिल्हा गॅझेटिअरने केली आहे. तसेच चंदपूर जिल्ह्यात (म्हणजे सांप्रतचा गडचिरोली सह) १९०६-७ मध्ये १,५०० मोठे तलाव आणि ४,००० बोड्या होत्या; असे चंद्रपूर जिल्हा गॅझेटिअरने म्हटले आहे. तर मारूती चितमपल्ली यांनी भंडारा व गोंदिया जिल्ह्यात लहानमोठी तीस हजार तळी आहेत, असे सांगितले आहे.

**मामा तलावांचे महत्व :-**

**सिंचन:**

मामा तलाव शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याचे महत्वाचे साधन आहे. पावसाचे पाणी साठवून, गरजेनुसार ते शेतीसाठी वापरले जाते, ज्यामुळे पिकांचे उत्पादन वाढण्यास मदत होते.

**पिण्याचे पाणी:**

या तलावांमध्ये साठवलेले पाणी पिण्यासाठी देखील वापरले जाते, ज्यामुळे पाण्याच्या टंचाईवर मात करता येते.

**भूजल पातळी वाढवणे:**

तलावांमुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढते, ज्यामुळे विहिरी आणि कूपनलिकांच्या पाण्याची पातळी सुधारते.

**पर्यावरण संतुलन:**

तलाव परिसरातील वनस्पती आणि प्राणीजीवनासाठी महत्वाचे आहेत. तलाव पाण्याच्या परिसंस्थेचा एक महत्वाचा भाग आहेत.

**पर्यटन:**

काही मामा तलावांचा उपयोग पर्यटन स्थळ म्हणून देखील केला जातो, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते.
उदा. नवेगावबांध, शिवनिबांध, रावणवाढी. इत्यादि

**मत्स्योत्पादन:**

काही मामा तलावांमध्ये मत्स्यपालन केले जाते तसेच काही तलावामध्ये शिंगाळे लागवट केली जाते ज्यामुळे स्थानिक लोकांचा उपजिविकेचा एक महत्वाचा स्त्रोत मिळतो.

**ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्व :**

मामा तलाव हे ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचे आहेत, कारण ते पूर्वीच्या काळातील जलव्यवस्थापनाचे उत्तम उदाहरण आहेत.

**निष्कर्ष :-**

१) पूर्व विदर्भातील अनेक गावात मामा तलावामुळे पाण्याची टंचाई भासत नाही.

२) मामा तलावात पावसाचे पाणी साठवून, गरजेनुसार ते शेतीला सिंचनसाठी वापरले जाते, त्यामुळे पिकांचे उत्पादन वाढण्यास मदत होते.

३) मामा तलावामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

उदा. पर्यटन, मासेमारी, शिंगाळे लागवट

**संदर्भ :-**

१) चितमपल्ली मारोती, 'पक्षी जाय दिगंतरा', साहित्य प्रसार प्रकाशन, नागपूर

२) बोरकर डॉ. हरिश्चंद्र प्रभाकर , ‘कोहळी’ अक्षय प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे-३०.

३) Bhandara District Gazetter, Resived Edition,1979

४) Chandrapur District Gazetter, Resived Edition,1973

SHRADHA EDUCATIONAL ACADEMY